# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**GOVERNMENT MEDICAL COLLEGE , CHHATRAPATI SAMBHAJINAGAR– PIN 431 001**

दुरध्वनी क्रमांक (0240) 2402412-17 ई-मेल :- deangmca@gmail.com , gmcaao@gmail.com


जा.क्र. शावैमछसं/वाहन विभाग/ 5158 /२०२५ दिनांक 20 JUN 2025

विषय :- वाहन भाडेतत्वावर करणे करिता दरपत्रके सादर करणेबाबत.

संदर्भ :- १) पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचा शासन निर्णय क्र मइवाधो२०२१/प्र.क्र.२५/ तां.क्र.४ दि.२३.०७.२०२१

२) मंजुर कार्यालयीन टिप्पणी दिनांक २०.०६.२०२५

विषयाकिंत प्रकरणी आपणांस आदेशीत करण्यात येते की, अधिष्ठाता,शासकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांना कार्यालयीन वापरासाठी संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच संदर्भ क्र २.च्या मंजुर कार्यालयीन टिप्पणीनूसार अधिष्ठाता यांना शासकिय कार्यालयीन कामकाजासाठी इलेक्ट्रीक वाहन पुरविण्याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन वाहनाचे दर कळविण्यात यावे. जेणे करुन न्युनतम दर प्राप्त झाल्यास वाहन भाडेतत्वावर घेण्यात येईल

| अ.क्र. | वाहनाचे नाव | दर |
|---|---|---|
| १ | इलेक्ट्रीक वाहन (वातानुकुलीत)/<br>इनोव्हा क्रिस्टा (वातानुकुलीत) | १) दरमहा प्रमाणे दर:-<br>२) १५०० पैक्षा जास्त चालल्यास प्रति कि.मी. दर - |

अटी व शर्ती.

१. नमुद करण्यात आलेले वाहन इलेक्ट्रीक असावे. व उपरोक्त दराव्यतीरिक्त कोणत्याही प्रकारची वाढ करता येणार नाही.
२. नमुद करण्यात आलेले वाहनाचा कालावधी हा दि ३०.०६.२०२६ किंवा शासनाकडुन वाहन उपलब्ध होईल तो पर्यंत या पैकी जे आधी घडेल तो पर्यंत राहील.
३. प्रादेशिक परिवन अधिकारी (आरटीओ) यांनी विहित केलेली सर्व कागदपत्र टॅक्सेस भरणा , इन्शुरन्स सुरक्षा विषयक सर्व बाबींचा अभ्यास करुन वेळोवळी अंमलबजावणी करणे इत्यादी बाबी अद्यावत ठेवणे आपल्यावर बंधनकारक राहील.
४. वाहनावरील वाहन चालकास गणवेश व भ्रमणध्वनी पुरविणे बाबतची जबाबदारी आपली राहील.
५. वाहनाची देखभाल दुरुस्ती,विमा आरठीऔ टॅक्सफिटनेस , सुशोभिकरण व तसेच चालकाचे मानधन व भत्ते आपण अदा करावे.
६. अपघात व इतर दुर्घटनेसंदर्भात सर्व बाबी आपल्या स्वत: सोडवाव्या व सांभाळाव्या लागतील.
७. सदर वाहनाचा प्रवास करण्यासाठी वापर दररोज २४ तासा करीता राहील.
८. वाहन बाहेर गावी गेल्यास वाहन चालकास कोणत्याही प्रकारचा भत्ता टोल टॅक्स किंवा इतर टॅक्सेस/खर्च या महाविद्यालयाकडुन देण्यात येणार नाही.
९. उपरोक्त कामाचे लेखी करारपत्र रुपये १०० रु च्या बाँडपेपरवर देणे बंधनकारक राहील.
१०. कामाच्या दिवशी वाहन नादुरुस्त हाणे किंवा इतर काही अडचणी आल्यास किंवा सुटीच्या दिवशी गरज भासल्यास तात्काळ पर्यायी वाहनाची व्यवस्था करणे आपणास बंधनकारक राहील.
११. आवश्यकता वाटल्यास एक महीन्याची पुर्व सुचना देऊन आपली वाहतुक सेवा बंद करण्यात येईल.
१२. आपले वाहन एक महीन्यात १५०० कि.मी. पर्यत आपणास चालवावे लागेल तदनंतर आपण दरपत्रकात नमुद केल्याप्रमाणे प्रती कि.मी. दर आकारण्यात येतील.
१३. सिलबंद केलेले दरपत्रके हि दिनांक 23/06/25 रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यत स्विकारण्यात येतील त्यांनतर अथवा पोस्टाने अथवा वेळेत न आलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाही.

अधिष्ठाता,
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

प्रति,

१) नोटीस बोर्ड : i) शासकिय वैद्यकिय महाविद्यालय ii) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय iii)अतिविशेषोपचार रुग्णालय iv) कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

२) अध्यक्ष संकेतस्थळ सुधारणा समिती यांना देऊन आदेशित करण्यात येते की, सदरची दरपत्रके तात्काळ संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.